आदेश

श्रीमती कमल नामदेव चिखले, आरोग्य सेवक (महिला), उपकेंद्र कारेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव ता. श्रीरामपुर यांची ऐच्छिक सेवा निवृत्ती मंजुरी बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं.आरोग्य/कार्या 2/आस्था 4/ 806 /2018
दिनांक 14 डिसेंबर 2018

वाचा :- 1) वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव यांचेकडील पत्र क्रमांक आरोग्य/207/2018 दिनांक 07/09/2018
2) श्रीमती कमल नामदेव चिखले, आरोग्य सेवक (महिला) यांची दि. 01/09/2018 रोजीची ऐच्छिक सेवा निवृत्ती नोटीस
3) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 चे नियम 65
4) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक साप्रवि -1/र. व का./696/2016 दिनांक 17/06/2016

श्रीमती कमल नामदेव चिखले, आरोग्य सेवक (महिला) उपकेंद्र कारेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव ता. श्रीरामपुर यांनी त्यांचेकडील सेवा निवृत्ती नोटीस दिनांक 01/09/2018 अन्वये ऐच्छिक सेवा निवृत्ती मंजुर करण्यासाठी विनंती केलेली असुन दिनांक 01/09/2018 पासुन नोटीस दिलेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 चे नियम 65 नुसार 30 वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर त्याला कोणत्याही वेळी सेवेमधुन निवृत्त होता येईल. शासकीय कर्मचा-याने ज्या तारखेस त्याची सेवानिवृत्त होण्याची इच्छा असेल त्या तारखेच्या तीन महिने अगोदर नियुक्ती प्राधिका-याला लेखी नोटीस दिली पाहिजे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक साप्रवि 1/र. व का./696/2016 दिनांक 17/06/2016 अन्वये ऐच्छिक सेवानिवृत्ती / रुग्णता सेवानिवृत्ती मंजुरी बाबत सर्व संवर्गातील गट क व गट ड मधील कर्मचा-यांचे बाबतीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) हे ऐच्छिक सेवा निवृत्ती मंजुर करण्यास सक्षम प्राधिकारी आहेत.

श्रीमती कमल नामदेव चिखले, आरोग्य सेवक महिला उपकेंद्र कारेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव ता. श्रीरामपूर यांच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच येणे बाकी नसून भविष्यात काही वसूली निघाल्यास ती त्यांना बंधनकारक असेल. या अटीवर ऐच्छिक सेवा निवृत्ती मंजुर करणे करिता जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी दिनांक 05/12/2018 च्या दाखल्यानुसार प्रमाणित केलेले आहे.

यास्तव मी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद अहमदनगर मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 चे नियम 65 अन्वये श्रीमती कमल नामदेव चिखले, आरोग्य सेवक (महिला) उपकेंद्र कारेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव

ता. श्रीरामपुर यांची दिनांक 30/11/2018 रोजी मध्यान्होत्तर ऐच्छिक सेवा निवृत्ती मंजुर करीत आहे. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव यांनी स्थानिक पातळीवर व्यवस्था करुन श्रीमती कमल नामदेव चिखले, आरोग्य सेवक (महिला) यांना दिनांक 30/11/2018 रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना देय सेवानिवृत्ती लाभासंबंधीत प्रकरणे तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 201812141004 10 असा आहे.

(वासुदेव सोळंके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्रीमती कमल नामदेव चिखले, आरोग्य सेवक (महिला)
प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव ता. श्रीरामपुर

प्रत :- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर,
प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर,
प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर,
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीरामपुर
प्रत :- वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव ता. श्रीरामपुर

(वासुदेव सोळंके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद अहमदनगर